# APPENDIX 24

साप्रवि/गट-८(रवका)/न. क्र. ८०६
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०००१९.

## सुधारपत्र क्रमांक १, दिनांक ३. ८. २००३
## (सर्वसाधारण आदेश क्र. १४६ (कर्मचारीवर्ग), दि. १९ जून १९९७ करिता)

विषय: विपश्यना संशोधन संस्था, इगतपुरी, जिल्हा नाशिक
यांनी आयोजिलेल्या विपश्यना प्रशिक्षणासाठी जाणा-या
मंडळाच्या कर्मचा-यांना परिवर्तीत रजा मंजूर करणेबाबत.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य शासनाचे वित्त विभागाच्या निर्णय क्र. अरजा. २४९६ सेवा-९ दिनांक १५ मे १९९६ मधील मार्गदर्शक तत्वाचा अंगीकार करुन विपश्यना संशोधन संस्था इगतपुरी, जिल्हा नाशिक यांचेमार्फत आयोजित करण्यात येत असलेल १० दिवसांचे विपश्यना प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या ४५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वय असणा-या मंडळातील कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील दर्जाच्या अधिका-यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता त्यांना १४ दिवसांची परिवर्तीत रजा व प्रवासभत्ता देण्याची तरतूद सर्वसाधारण आदेश क्र. १४६ (कर्मचारीवर्ग) दिनांक १९ जून १९९७ अन्वये अधिसूचित केली होती.

२. विपश्यना संशोधन संस्था, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांनी आयोजिलेल्या १० दिवसाच्या विपश्यना प्रशिक्षणास हजर होवू इच्छिणा-या मंडळातील सर्वच कर्मचा-यांना वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २७ जून २००३ च्या निर्णयाच्या धर्तीवर, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता १४ दिवसांची परिवर्तीत रजा मंजूर करण्याचा प्रश्न गेले काही दिवस मंडळाच्या विचाराधीन होता.

**मंडळ ठराव**

त्यानुसार मंडळाने ठराव क्र. ११७ दि. २४ जुलै २००३ अन्वये त्यानुसार पुढील बाबीस मंजूरी प्रदान केली आहे

(एक) विपश्यना संशोधन संस्था, धम्मगिरी, इगतपुरी जिल्हा नाशिक यांच्यामार्फत आयोजित केल्या जाणा-या १० दिवसाच्या 'विपश्यना' प्रशिक्षणाचा लाभ घेऊ, इच्छिणा-या मंडळातील सर्व कर्मचा-यांना महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचा निर्णय दि. २७ जून २००३ च्या धर्तीवर, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता १४ दिवसांची परिवर्तीत रजा मंजूर करणे.

(दोन) महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या दिनांक २१ जुलै १९९८ च्या निर्णयानुसार मंडळाने अधिसूचित केलेल्या सर्वसाधारण आदेश क्र. १४६ (कर्मचारी वर्ग), दिनांक १९/६/१९९७ अनुसार कर्मचा-यास मुख्यालयापासून प्रशिक्षण केंद्रापर्यंत सर्वात जवळच्या मार्गाने तो पात्र असलेल्या श्रेणीने जाण्यायेण्यासाठी देण्यात येत असलेले प्रवासाचे भाडे देण्याची विद्यमान तरतूद रद्द करण्यात येत आहे ही रद्द केलेली तरतूद हा आदेश जारी झाल्याच्या तारखेपासून लागू होईल.

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार, भविष्यात या तरतुदीत आवश्यक ते बदल/सुधारणा करण्याचे अधिकार अध्यक्षांना प्रदान करण्यात आले आहेत.

२. महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या दि. २७ जून २००३ च्या निर्णयान्वये जारी केलेल्य तरतूदीनुसार विपश्यना प्रशिक्षण घेण्यासाठी देण्यात येत असलेली रजेची सवलत ही कर्मचा-याचा हक्क म्हणून मानता येणार नाही.

३. मंडळाने आणखी असाही निर्णय घेतला आहे की, मंडळाच्या सर्वसाधारण आदेश क्र. १४६ (कर्मचारीवर्ग) दिनांक १९/६/९७ मध्ये नमूद केलेल्या ज्या तरतूदी महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. २७/६/२००३ च्या अनुरूप असतील त्या अबाधित राहतील.

४. वरील सुधारित तरतूदी हे सुधारपत्र जारी केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सही/-
(संजय भाटिया)
सचिव

प्रति:
प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.